MHBI060007852023

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १४३/२०२३ मधील**
**निशाणी क्रमांक ०५ वर अंतरीम पोटगी आदेश**
(सीएनआर: एमएचबीआय०६०००७८५२०२३—२०२३)

अर्जदार यांनी सदरचा अर्ज कौटूंबीक हिंसाचारा पासुन महिलांचे संरक्षण अधिनियम, २००५ अन्वये अंतरीम पोटगी मिळणेकरीता दाखल केला आहे.

**२.** अर्जदार यांनी असे कथन केले की,अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ हे पती पत्नी असुन अर्जदार क्र. २ व ३ ही त्यांची मुले आहेत. गैरअर्जदार क्र. २ हा अर्जदार क्र. १ चा सासरा व गैरअर्जदार क्र. ३ ही सासु व गैरअर्जदार क्र. ४ व ५ हे अर्जदार क्र. १ चे दीर आहेत. अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचे लग्न सन २०१३ मध्ये अर्जदार क्र. १ सोबत झाले असुन सदर लग्नाचा एक लाख रूपये खर्च अर्जदार हिच्या आईवडीलांनी केला आहे. लग्नामध्ये अर्जदार क्र. १ च्या आईवडीलांनी दोन लाख रूपये हुंडा व दोन तोळे सोने देवून झुमके, मनिमंगळसूत्र, माळ, चेन, जोडवे व इतर दागिने करून दिले. तसेच मान सन्मानासह संसार उपयोगी वस्तु देवून थाटात लग्न करून दिले आहे. लग्नानंतर अर्जदार क्र. १ ही गेरअर्जदारांच्या घरी नांदावयास गेली. तेथे गैरअर्जदार यांनी कुरापती काढुन छोटया छोटया कारणावरून अर्जदार क्र. १ सोबत वाद घालु लागले. गैरअर्जदार क्र. १ हा अर्जदार क्र. १ ला तु तुझे आई बापाकडून एक लाख रूपये घेवू नये नाही तर तला जिवंत मारून टाकीन असे म्हणत असे. अर्जदार क्र. १ च्या आईवडीलांची हालाखीची परिस्थीती असताना देखील उसने पैसे घेवून गैरअर्जदा यास दिले. त्यामध्ये त्या पैशात त्याने दुचाकी घेतली.

**३.** गैरअर्जदार क्र. १ हा नेहमी अर्जदार क्र. १ ला शारीरीक व मानसिक छळ करून रात्र रात्र घराबाहेर उभे करायचा. गैरअर्जदार क्र. १ हा व्यसनाधीन होवून दारू पिवून अर्जदार क्र. १ चा अमानुष छळ करायचा व गैरअर्जदार क्र. १ ला गैरअर्जदार क्र. २ ते ५ चिथावणी देत असत व गैरअर्जदार क्र. १ ला मारहाण

करण्यास भाग पाडत असत. त्याबाबत अर्जदार क्र. १ हिने वेळोवेळी पोलीस ठाणे अंबाजोगाई ग्रामीण येथे दिनांक १५.०९.२०२२, १५.११.२०२२, १०.१२.२०२२ व १५.०३.२०२३ रोजी लेखी तक्रारी दिलया आहेत. परंतु पोलीसांनी गैरअर्जदार यांच्या विरोधात कोणतीही कारवाई केली नाही. गैरअर्जदारांनी अर्जदारास दिनांक २०.११.२०२२ रोजी घरातून अंगावरील सर्व दागिने काढुन घेवून अर्जदार यांना घरातुन हाकलून दिले आहे. गैरअर्जदार यांची आर्थिक परिस्थीती उत्तम असुन ते ऐश आरामात जिवन जगत आहेत.

४. गैरअर्जदार यांच्याकडे शेत जमीन असुन वर्षाकाठी त्यातुन सात ते आठ लाख रूपये उत्पन्न मिळते. गैरअर्जदार क्र. १ हा सहयाद्री हॉटेल अंबाजोगाई येथे मॅनेजर म्हणून नोकरीस असुन त्याला रू. ३५,०००/— प्रती महिना पगार आहे. हे सर्व पैसे गैरअर्जदार क्र. १ हा स्वतःच्या व्यसनावर उधळत आहे. तसेच गैरअर्जदार क्र. २, ४ व ५ हे सुध्दा नोकरीस आहेत. गैरअर्जदार यांच्याकडे काळवटी तांडा येथे आठ रूमचे स्लॅपचे घर असुन एक खुल्ला प्लॉट देखील आहे. त्यामुळे गैरअर्जदार क्र. १ कडून अर्जदार क्र. १ ते ३ यांना प्रत्येकी १०,०००/— पोटगी देण्यात यावी व गैरअर्जदारांनी अर्जदार क्र. १ ते ३ यांना कोणताही त्रास स्वतः अथवा इतरांमार्फत देवू नये, असा संरक्षणाचा आदेश देण्यात यावा. तसेच कलम १९ (३), (५), (६), (७) व (८) प्रमाणे अर्जदारांच्या मागण्या मान्य करून कलम १९—ड प्रमाणे अर्जदाराच्या हक्काच्या भागातील जागा विकण्यास व तारण ठेवण्यास प्रतिबंध करणे न्याय आवश्यक आहे. तसेच गैरअर्जदार यांनी त्यांच्या नावावर असलेली मालमत्ता विकू नये किंवा अन्य प्रकारे हस्तांतर करू नये असा आदेश करण्यात यावा.

५. गैरअर्जदार यांनी निशाणी १४ वर त्यांचे म्हणणे सादर करून अर्जास विरोध केला. गैरअर्जदार यांनी कलम १ मधील मजकूर खरा व बरोबर असल्याने मान्य करून इतर सर्व मजकूर नाकारला आहे. अर्जदार ही गैरअर्जदारांकडे दोन दिवस चांगली नांदली व लग्नातील पाहुणे गेले की, इतीजातीहून आल्यानंतर

गैरअर्जदार यांना पोलीसांची भिती घालून भांडणे करू लागली. अर्जदार क्र. १ हिने दिनांक १९.०९.२०१३ रोजी गैरअर्जदार यांच्या वर भारतीय दंड विधान कलम ४९८—अ, ३२३, ५०४, ५०६ सह कलम ३४ अन्वये खाजगी फिर्याद दाखल केली. सदर प्रकरणात कोणीही हजर न राहील्याने सदर प्रकरण दिनांक ११.०४.२०१४ रोजी बंद केले आहे. अर्जदार क्र. १ही तिच्या नातेवाईकांमार्फत लग्न झाल्यापासून आज तागायत गैरअर्जदार क्र. १ ते ५ यांना खोडसाळपणे त्रास देण्याच्या उददेशाने खोटया केसेस करत आलेली आहे. गैरअर्जदार हे उसतोडीचे काम करतात. अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ हे इतर गैरअर्जदारांपासून वेगळे रहात आहेत.

**६.** अर्जदार क्र. १ ही गावाकडे राहुन शेतात मजूरीला जावून अंदाजे रू. १५ ते २० हजार महिन्याकाठी कमावते. अर्जदार क्र. १ ने दिनांक १५.११.२०२२ रोजी पोलीस ठाणे अंबाजोगाई ग्रामीण येथे तक्रार देवून एन सी क्र. ४३१/२०२२ दाखल केली. त्यामध्ये दिनांक ११.११.२०२२ रोजी रात्री ०९.०० च्या सुमारास अर्जदार हिच्या माहेरी काळवटी तांडा येथे अर्जदार हिस गैरअर्जदार यांनी मारहाण करून शिवीगाळ व जिवे मारण्याची धमकी दिल्याची तक्रार दिली होती. त्याची कागदपत्रे गैरअर्जदार यांनी दाखल केली आहेत. गेल्या एक वर्षापूर्वी गैरअर्जदार क्र. १ च्या घरातील संपूर्ण संसार उपयोगी सामान, सोने, रक्कम घेवून अर्जदार क्र. १ हिने तिच्या आईच्या घरी नेवून ठेवली आहेत. गैरअर्जदार क्र. १ ला केवळ एक पत्र्याचा डबा व चिखलमातीत वर पत्रे असलेली रूम आहे. अर्जदार क्र. १ ही गैरअर्जदार क्र. १ ला न सांगता सन २०२२ पासून तिच्या माहेरी रहात आहे. आजतागायत गैरअर्जदार क्र. १ ला जावाई व पती म्हणून मुलाबाळांना भेटण्यासाठी अर्जदार क्र. १ व तिचे आईवडील, भाउ, भाउजया येवू देत नाहीत. अर्जदार क्र. १ चा सदर अर्ज मन घडत, खोटा व बनावट असुन गैरअर्जदार क्र. १ ला त्रास देण्याच्या उददेशाने व अर्जदार क्र. १ मुलाबाळासह नांदावयास येईल या उददेशाने सतत पोलीसांची भिती दाखवत असतात. त्यामुळे अर्जदार क्र. १ हिचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा.

७. प्रस्तुतच्या अर्जाचे, त्यावरील म्हणण्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले. अर्जदार यांच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

## कारणमिमांसा

८. अर्जदार यांचे विद्वान विधीज्ञांनी अर्ज व त्यावरील म्हणण्याच्या अनुषंगाने युक्तिवाद केल्याने सदर युक्तिवाद कथनाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी येथे नमुद केला नाही. अर्जदार यांनी त्यांच्या अर्जाच्या पुष्टयर्थ निशाणी क्र. ४ च्या यादीसोबत एनसीआर दाखल केल्या आहेत. अर्जदार यांनी त्यांच्या अर्जाच्या पुष्ठर्थ निशाणी क्र. ११ वर ॲसेटस ॲन्ड लिॲबीलीटीज दाखल केले आहे. गैरअर्जदार यांनी निशाणी क्र. १५ वरी कागद यादीसोबत नियमीत फौ. खटला क्र. १५/२०१५ च्या न्यायनिर्णयाची सत्यप्रत व प्रायव्हेट कंप्लेंट संक्षिप्त फौ. खटला क्र. ७८/२०१५ च्या निशाणी क्र. १ ची सत्यप्रत व एनसीआर क्र. ४३१/२०२२ ची छायांकीत प्रत दाखल केली आहे.

९. प्रस्तुतच्या अर्जाचे अवलोकन केले व अर्जदार यांच्या वकीलांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निर्देशीत होते की, अर्जदार क्र. १ व गैरअर्जदार क्र. १ यांच्यामध्ये पतीपत्नी या नातेसंबंधाविषयी कोणताही वाद दिसून येत नाही. त्यामुळे उभयतांमधील पतीपत्नीचे संबंध अस्तित्वात आहेत हे प्रथमदर्शनी संयुक्तिक दिसते. अर्जदार क्र. १ ते ३ हे गैरअर्जदार यांच्या पासून वेगळे राहतात ही बाब निर्विवादीत आहे. अर्जदार यांनी त्यांना गैरअर्जदार यांनी शारिरीक व मानसिक छळ केला असल्याबाबतचे कथन अर्जात नमुद केले आहे व त्या संदर्भातील प्रतिज्ञापत्रही अभिलेखावर आहे. अर्जदार यांना अर्ज दाखल तारखेपासून गैरअर्जदार यांनी कोणतीही आर्थिक मदत केलेली नाही. गैरअर्जदार यांना उत्पन्नाचे साधन असल्याबाबत व अर्जदार यांना उत्पन्न

नसल्याबाबत अर्जदार यांनी शपथेवर सांगितले आहे. अर्जदार क्र. १ ही रोजनदारीने काम करून दरमहा १५ ते २० हजार रूपये मिळवत असल्याबाबत गैरअर्जदार यांनी कथन केले असले तरी सुध्दा त्याच्या पुष्ठर्थ काहीही दाखल केले नाही. अभिलेखावरील कौटुंबिक घटना अहवाल व अर्जदार यांचे शपथपत्र पाहता गैरअर्जदार यांनी अर्जदार यांच्यावर घरगुती हिंसाचार केल्याचे सकृतदर्शनी दिसुन येत आहे. यावरून अर्जदार हिच्या बाजुने प्रथमदर्शनी प्रकरण असल्याचे दिसुन येते.

**१०.** हे न्यायाचे प्रस्थापित तत्व आहे की, पत्नीचा व अज्ञान मुलांचा सांभाळ करणे हे पतीचे कायदेशीर तसेच नैतिक कर्तव्य आहे. सबब या प्रस्थापित तत्वानुसार अर्जदार क्र. १ ते ३ हे तुर्तातुर्त पोटगी मिळण्यास पात्र आहेत.

**११.** अर्जदार यांना तुर्तातुर्त पोटगीची रक्कम ठरविताना गैरअर्जदार यांचे उत्पन्न, त्यांच्यावर अवलंबुन असणा—या व्यक्ती, त्यांचा राहण्याचा दर्जा व अर्जदार यांना त्याच दर्जाचे आयुष्य उपभोगण्यासाठी लागणारा सरासरी खर्च हे ठोकताळे आहेत. प्रस्तुत प्रकरणात जरी अर्जदार यांनी गैरअर्जदार यांच्या उत्पन्नाच्या स्त्रोतांबाबत माहिती दिलेली असली तरी त्याबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर नाही. अर्जदार क्र. १ ते ३ हे अर्जदार क्र. १ यांच्या आईवडीलांच्या घरी काळवटीतांडा येथे राहत आहेत. अशा परिस्थीतीत अर्जदार हीस अर्जदार क्र. २ यव ३ यांचे दैनंदीन गरजांसाठी व शिक्षणासाठी पैशेही लागू शकतात. उभय पक्षांचे वयोमानाचा विचार करता अर्जदार ही गैरअर्जदार यांच्याकडून दरमहा रक्कम रू. ३०००/— व अर्जदार क्र. २ व ३ याना दरमहा प्रत्येकी र.रू. १०००/— अंतरिम पोटगी म्हणून मिळण्यास पात्र आहेत. कायदयाच्या प्रस्थापीत तत्वानुसार सदरची रक्कम ही अर्जाच्या तारखेपासून गैरअर्जदार यांनी देय करणे गरजेचे आहे. ज्या अर्थी अर्जदार ही तुर्तातुर्त पोटगी मिळण्यास पात्र आहे व तुर्तातुर्त पोटगीची रक्कम तार्कीक कारणे देवून निश्चीत केली आहे त्याकरीता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

<u>आदेश</u>

१) अर्जदाराचा अर्ज अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

२) गैरअर्जदार क्र. १ यांनी प्रस्तुत अर्ज (निशाणी क्र. ०५) दाखल केल्यापासून अर्जदार क्र. १ यांना दरमहा र.रू. ३०००/— व अर्जदार क्र. २ व ३ यांना प्रत्येकी र.रू. १०००/ — दरमहा मुळ अर्जाचा निकाल लागेपावेतो अंतरीम पोटगी म्हणुन द्यावेत.

३) गैरअर्जदार क्र. १ यांनी अंतरीम पोटगीची रक्कम दर महिन्याच्या १० तारखेच्या आत अर्जदार हिस प्रत्यक्ष अथवा अर्जदार हिच्या बॅंक खात्यात जमा करून अथवा न्यायालयात भरून अदा करावी.

४) गैरअर्जदार क्र. १ यांनी अंतरीम पोटगीची आजपर्यंतची थकबाकी पुढील सहा महिन्यात सहा समान हप्त्यांमध्ये अदा करावी.

दि. १६.०५.२०२५
स्थळ: अंबाजोगाई

( ए.एम.ढवळे )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट क्र. ३, अंबाजोगाई